| | |
|---|---|
| MHNS200009242013 | प्राप्त दिनांक - ३०/०४/२०१३<br>नोंदणी दिनांक - ३०/०४/२०१३<br>निकाल दिनांक - १०/०३/२०२६<br>कालावधी - वर्ष-महिने-दिवस<br>१२ -१०-१० |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २ सिन्नर यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी ऋषिकेश रामदास जाधव)**

भाग **- 'अ'**

**Form No. XXXII**

**(Title Page of the Judgment)**

**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

**नियमित फौजदारी खटला क्र. १०७/२०१३**

**निशाणी क्रमांक – १२०**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन,तर्फे : पोलिस स्टेशन अधिकारी,**<br>पोलीस स्टेशन, सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | श्री. एफ. ए. शेख<br>सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | | १. सुदाम निवृत्ती सहाणे, वय –२९ वर्ष,<br>२. राधाबाई निवृत्ती सहाणे, वय –६५ वर्ष,<br>३. चंद्रभागाबाई म्हसुजी सोनवणे, **(मयत)**<br>४. मिना लक्ष्मण दातीर, वय – ३५ वर्ष,<br>५. परशुराम बाळकृष्ण सहाणे, वय – ४६ वर्ष,<br>६. अलकाबाई परशुराम सहाणे, वय – ४० वर्ष, |

| | | |
|---|---|---|
| | | क्र. १, २ व ६ रा. हिवरे, ता. सिन्नर, जि. नाशिक.<br>क्र. ४ रा. गणोरा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.<br>क्र. ५ रा. आगार टाकळी नाशिक. |
| **आरोपींतर्फे वकील** | | श्री. एस. एम. जोशी |

भाग - **'ब'**

**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | दिनांक २६/०५/२०११ नंतर तीन महिन्यांपासुन ते दिनांक ०१/१०/२०१२ पर्यंत |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | ४८/२०१३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ३०/०४/२०१३ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | १८/०९/२०१७ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | ३०/०१/२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १०/०३/२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | -- |

## आरोपीची माहिती

| अ.क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | केलेचा दिनांक | | दोषसिध्द केले | | नुसार आरोपींनी संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
| १ | सुदाम निवृत्ती सहाणे | २८/०२/२०१३ | २८/०२/२०१३ | भा.दं.वि. कलम ४९८-अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| २ | राधाबाई निवृत्ती सहाणे | -''- | -''- | -''- | -''- | -''- | -''- |
| ४ | मिना लक्ष्मण दातीर | -''- | -''- | -''- | -''- | -''- | -''- |
| ५ | परशुराम बाळकृष्ण सहाणे | -''- | -''- | -''- | -''- | -''- | -''- |
| ६ | अलकाबाई | -''- | -''- | -''- | -''- | -''- | -''- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | परशुराम सहाणे | | | | | | |

## <u>(भाग – 'क')</u>

## <u>(Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)</u>

अ) अभियोग पक्षाचे साक्षीदार–

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | मधुकर मोहन देशमुख | ९९ | पोलीस ठाणे अंमलदार |
| अ.सा.क्र.२ | कविता सुदाम सहाणे | १०४ | वर्दीदार |

ब) बचाव पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

क) न्यायालयीन साक्षीदार–

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**निशाणी कागदपत्रांची यादी–**

अ) अभियोगपक्ष–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | नि.क्र. १०० | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| २ | नि.क्र. १०५ | फिर्यादवरील वर्दीदाराची सही |

ब) बचावपक्ष –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क) न्यायालय –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

ड) भौतिक वस्तु –

| अ.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## न्यायनिर्णय

(दि. १०/०३/२०२६)

प्रस्तुत आरोपींनी भारतीय दंड विधान (यानंतर भा.दं.वि. असा संक्षिप्त उल्लेख) कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत खटला चालविण्यात आला.

**२)** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

दि. २५/०२/२०१३ रोजी वर्दीदार कविता सुदाम सहाणे, हल्ली रा. आगर टाकळी राजवाडा रिक्षा स्टॅण्ड जवळ, नाशिकरोड, नाशिक हिने वर्दी दिली की, दिनांक २६.०५.२०११ रोजी तिचा विवाह झाल्यानंतर तिन महिन्यानंतर तिला तिचे पती व

सासु हे घर घेण्यासाठी तिचे माहेरुन एकलाख रुपये आणावे या कारणावरुन कुरापत काढुन तिला दररोज शिवीगाळ व मारहाण करत असे. परंतु तिच्या आईवडिलांची परिस्थिती हलाखीची असल्याने ते एकलाख रुपये देवु शकत नाही असे म्हणताच आरोपी क्र. १ तिस म्हणाला की, ''भिकारी मी दुस–या मुलीशी लग्न केले असते तर बरे झाले असते'' असे बोलुन तिला मानसिक व शारिरिक त्रास देवुन शिवीगाळ करुन मारहाण करीत असे. म्हणुन वर्दीदाराने तिच्या सासुला सांगितले असता ति देखील वर्दीदाराला घालुनपाडून बोलून मानसिक त्रास देत असे. तिने सर्व प्रकार तिच्या आईवडिलांना सांगितला असता ते तिला समजुत काढुन सासरी नांदविण्यास पाठवित असे व ती त्यांचा सर्व त्रास सहन करत होती. तसेच आरोपी क्र. ४, ५ व ६ हे देखील त्यांचे घरी येवुन तिच्या पतीस चिडवुन देत असे व त्यामुळे आरोपी क्र. १ हा वर्दीदारास मारहाण करुन शिवीगाळ करत असे. दिनांक ०१.१०.२०१२ रोजी आरोपी क्र. १ व २ यांनी ''तुझे माहेरुन एक लाख रुपये घेवुन ये, नाहीतर मी तुला नांदविणार नाही'' असा दम देवुन तिला सकाळी ११.०० वाजेच्या सुमारास घरातुन बाहेर हुसकावुन दिले. त्यामुळे तिने आरोपींविरुध्द वर्दी दिलेली आहे.

## अन्वेषण व दोषारोप

**३)** सदर जबाबावरुन प्रस्तुत आरोपींनी भा.दं.वि. कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत त्यांचे विरुध्द सिन्नर पोलिस ठाणे येथे गु.र.नं. ४८/२०१३ नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार श्री. सी. डी. भागडे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. उर्वरित तपास पूर्ण करुन आरोपींनी उपरोक्त नमूद कलमान्वये गुन्हा केल्याचे नमूद करुन दोषारोपपत्र दाखल केले.

**४)** आरोपींनी भा.दं.वि. कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४

प्रमाणे गुन्हा केल्याबाबत नि.क्र. ३९ अन्वये दोषारोप निश्चित करुन त्यातील मजकूर आरोपींना वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी नि.क्र. ४० ते ४५ अन्वये निवेदन नोंदवून गुन्हा कबुल नसल्याचे नमूद केले. सबब, खटल्याचे कामकाज पुढे चालविण्यात आले.

५) उपरोक्त आरोपींच्या विरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाद्वारे केवळ दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सरकारी विधिज्ञांच्या विनंतीवरुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपींचे विरुध्द ग्राहय धरण्याजोगी बाब न आल्याने आरोपींचे फौ.प्र.सं.क. ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६) उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

७) अभियोग पक्षाच्या कथनावरुन विचारार्थ उपस्थित झालेल्या बाबी व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहेत,

| अ.नं. | विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.२६/०५/२०११ नंतर तीन महिन्यांपासुन ते दिनांक ०१/१०/२०१२ रोजी पावेतो वर्दीदाराच्या सासरच्या घरी तुम्ही आरोपींनी संगनमत करुन वर्दीदार हिला घरगुती कारणावरुन कुरापत काढुन व घर बांधण्यासाठी रक्कम रुपये एक लाखाची बेकायदेशीरपणे मागणी करुन तिचा शारीरीक व मानसिक छळ केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही |
| २ | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, उपरोक्त आरोपींनी | नाही |

| | | |
|---|---|---|
| | संगनमताने वर्दीदार हिस मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| ३ | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, उपरोक्त आरोपींनी संगनमताने वर्दीदार हिस शिवीगाळ करुन जाणीवपूर्वक अपमानित केले व सदर कृत्यामुळे त्याचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा एखादा अपराध घडण्याची शक्यता असल्याची जाणीव असून देखील त्यास तसे करण्यास प्रक्षोभित केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ४ | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, उपरोक्त आरोपींनी संगनमताने वर्दीदार हिस दमदाटी करुन फौजदारी धाकदडपशा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ५ | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>विचारार्थ बाब क्र. १ ते ४ करीता</u> :**

८) अभियोग पक्षाच्या हकीकतीनुसार दिनांक २६.०५.२०११ रोजी तिचा विवाह आरोपी क्र. १ सोबत झालेनंतर तीन महिन्याने आरोपी हे तिला घर बांधण्यासाठी माहेरुन एक लाख रुपये आणण्यास त्रास देत असे व त्या कारणावरुन तिचा मानसिक व शारिरिक छळ करीत असे. तसेच तिला मारहाण करुन, शिवीगाळ व दमदाटी करत असे.

९) त्याअनुषंगाने साक्षीदार मधुकर (अ.सा.क्र.१) याच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यात त्याने सांगितले की, ते सन २०१३ साली सिन्नर पोलीस स्टेशन येथे पोलीस हवलदार म्हणुन कार्यरत होते व दिनांक २५.०२.२०१४ रोजी त्यांची सिन्नर पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणुन डयुटी होती. त्या दिवशी त्यांना उपनगर पोलीस स्टेशन येथुन झिरो नंबर गुन्हा आला व त्यांनी वरिष्टांच्या आदेशावरुन गुन्हा दाखल करुन घेतला.

१०) त्याअनुषंगाने साक्षीदार वर्दीदार (अ.सा.क्र.२) हिच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यात त्याने सांगितले की, आरोपी क्र. १ हा तिचा पती असुन इतर आरोपी हे आरोपी क्र. १ याचे नातेवाईक आहे. तसेच तिने आरोपींनी तिला काहीही त्रास दिला नसल्याचे, मारहाण व शिवीगाळ केलेली नसल्याचे तिने तिच्या साक्षीत सांगितले आहे. सदरील साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याचे कारण देवुन सरकारी वकिलांनी तिस उलटतपासात विचारता येण्याजोगे उत्तरसुचक प्रश्न विचारले असता, त्यात तिने अमान्य केले की आरोपी हे तिला घर घेण्याकरिता एक लाख रुपये घेवुन येण्यासाठी छळ करत होते व मानसिक व शारिरिक त्रास देवुन मारहाण करत होते. सर्वात महत्वाची बाब म्हणजे तिने तिच्या उलटतपासात तिची आरोपींबरोबर तडजोड झाल्याचे सांगितले आहे.

११) महत्वाची बाब म्हणजे, वर्दीदार (अ.सा.क्र.२) हिने तिच्या उलटतपासामध्ये तिचे आरोपींशी तडजोड झाल्याचे मान्य केले आहे. या सर्व बाबी पाहता, आरोपींचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने सबळ पुरावा अभिलेखावर आला नसल्याचे स्पष्ट होते. सबब, सदरचा दोषारोप सिध्द होत नसल्याने विचारार्थ बाब क्र. १ ते ४ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>विचारार्थ बाब क्र. ५ करीता</u> :**

**१२)** आरोपींनी भा.दं.वि. कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे हे अभियोग पक्ष संशयापलीकडे सिध्द करु शकलेला नाही. त्यामुळे, प्रस्तुत आरोपी हे सदर दोषारोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, विचारार्थ बाब क्र. ५ साठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे. .

**– <u>आदेश</u> –**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१) सुदाम निवृत्ती सहाणे, २) राधाबाई निवृत्ती सहाणे, ४) मिना लक्ष्मण दातीर, ५) परशुराम बाळकृष्ण सहाणे, ६) अलकाबाई परशुराम सहाणे यांची भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारापातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींनी यापूर्वी दिलेले जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) चे पुर्ततेकामी आरोपींनी यापुर्वीच जामीन बंधपत्र दिलेले आहे. |
| ४. | प्रस्तुत न्याय निवाडयाबाबत व वर्दीदार यांना अपीलाचा अधिकार असल्याबाबत अवगत करणेकामी प्रस्तुत न्याय निवाडयाची प्रत मा. जिल्हा दंडाधिकारी, नाशिक यांच्यामार्फत वर्दीदार यांना पाठविण्यात यावी. तसेच वर्दीदार यांना प्रत मिळाल्याची पोहोच मा. जिल्हा दंडाधिकारी, नाशिक यांच्या कडून प्राप्त होताच त्याबाबतची नोंदवही मध्ये नोंद घेण्यात यावी. |
| | न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. |

RUSHIKESH RAMDAS JADHAV
Digitally signed by RUSHIKESH RAMDAS JADHAV
Date: 2026.03.12 16:51:46 +0530

दि. १०/०३/२०२६. (ऋ.रा.जाधव)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

न्यायालय क्र. २, सिन्नर.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. M. Morankar |
| Court | : | 2nd Jt. Judicial Magistrate F.C., Sinnar |
| Date | : | 10.03.2026 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 10.03.2026 |
| Judgment Uploaded on | : | 12.03.2026 |